आरोग्य सेवा आयुक्तालय (महाराष्ट्र शासन)
" आरोग्यभवन, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, पी.डी. मेलो रोड,मुंबई-४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| संचालक कक्ष | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक(रुग्णालये राज्यस्तर ) | २२६२१००६<br>२२६११४७१ | Email : jdhs03@gmail.com<br>Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |

| आदेश | क्र.आसेआ/कक्ष-३/टे-१/प्रात्य. अनुभव /परवानगी /प्राचार्य, दत्ता मेघे कॉलेज ऑ.नर्सिंग हिंगाणा रो.वा.नागपूर / १७ए५२-५४ /२१,<br>दिनांक २५ /१० /२०२१ |
|---|---|

विषय- खाजगी निमवैदयकिय संस्थेला अनुभवाकरीता परवानगी मिळणेबाबत.
प्राचार्य, दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, हिंगणा रोड, वानाडोंगरी, नागपूर
संदर्भ-१)उपसंचालक आरोग्य सेवा,नागपूर मंडळ,नागपूर यांचे पत्र जा.क्र.ब- शुश्रुषा/ एएनएम-नर्सिंग/दत्ता मेघे कॉलेज/१८६४५-४७/२१, दिनांक ०२.०८.२०२१
२) सार्वजनिक आरोग्य विभाग आ-४ यांचे शासन निर्णय क्र. प्राअसं-२०१२/ ६३९/प्र.क्र.११७/आरोग्य -४,मंत्रलाय ,मुंबई दिनांक १८.९.२०१२
३) शासन शुध्दीपत्रक सार्वजनिक आरोग्य विभाग, आ-४ यांचे शासन क्र.प्राअसं- २०१२/६३९/प्र.क्र.११७/आरोग्य-४,मंत्रालय,मुंबई,दि.२०.११.२०१२

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्रान्वये उपसंचालक आरोग्य सेवा,नागपूर मंडळ,नागपूर यांचेकडून नगर युवक शिक्षण संस्था,नागपूर द्वारा संचालीत दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग वानाडोंगरी नागपूर या संस्थेंचा प्रात्यक्षिक अनुभवासाठी परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव या आयुक्तालयास प्राप्त झालेला आहे..

सदर खाजगी संस्थेतील बीएस्सी ६० विद्यार्थी व जीएनएम ६० विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रात्यक्षिक अनुभवासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, रायपुर,कान्होलीबारा,अडेगांव कचेरीसावंगा ,डोरली,व्याहाड जि.नागपूर येथे संदर्भीय शासन निर्णयातील अटी व शर्ती आणि उपंसचालक आरोग्य सेवा,नागपूर मंडळ,नागपूर यांच्या शिफारशीच्या अधिन राहुन सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्ष करीता **प्रथम वर्ष साठी परवानगी प्रदान करण्यात येत आहे.**

१ सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैदयकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी सध्या निर्देशित अटी व शर्तीचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

Scanned by CamScanner

२ या शैक्षणिक वर्ष नंतर सदर परवानगी ची प्रथम मूदत वाढ संबंधित,जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,नागपूर यांच्या कडुन घेण्यात यावी यांनी सन २०२०-२०२१ व २०२१-२२ २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी नियमानुसार मूदतवाढ प्रदान करावी.

३ सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर २०१२ मधील अट क्रमांक १० नुसार तीन वर्षाच्या कालावधित स्वत: ची रुग्णालयीन सुविधा उपलब्ध करुन घ्यावी तीन वर्षानंतर शासकीय रुग्णालयातील खाटा वापरण्यास परवानगी मिळणार नाही.

४ संदर्भीय शासन निर्णय क्र.२ व ३ मधील अटी व शर्तीची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांची राहील.

५ संबंधित संस्थेकडून अग्रिम शुल्क आकारणी करुन त्याचा भरणा चलना द्वारे शासन खाती जमा करण्यात यावे व याबाबतचे सर्व अभिलेख स्वतंत्र रित्या ठेवून, तपासणीच्या वेळी संबंधितांना वेळोवेळी उपलब्ध करुन घावे. या खाती जमा केलेल्या रक्कमेचा हिशोब अचुक व अद्यावत राहील या बाबतची सर्वस्वी जबाबदारी,जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांची राहील.

६ जिल्हयातील सर्व मान्यता प्राप्त निमवैदयकिय विद्यालयाची एकुण संख्या लक्षात घेता,जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर यांनी त्यांच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयातील खाटा वापराबाबतचे स्थानिक स्तरावर नियोजन करावे. एकाच कालावधीत दुबार खाटा वापरण्यात देता येणार नाही, याद्दष्टीने जिल्हा स्तरावर आवश्यक ती खबरदारी/ व्यवस्थापन करण्यात यावे.

(मा.आयुक्त महोदय यांनी मान्य केलेल्या टिपणीनुसार)

सहसंचालक आरोग्य सेवा,
(रुग्णालये-राज्यस्तर) मुंबई.

प्रति,

उपसंचालक आरोग्य सेवा,नागपूर मंडळ, नागपूर

प्रत- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर

२/- आपणांस कळविण्यांत येते की संबंधित संस्थेकडून शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर २०१२ च्या शासन निर्णनुसार प्रथमत. अग्रिम शुल्क भरणा करण्यात यावा. तसेच आदेशातील नमूद अटी व शर्तीची पुर्तता करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची नोंद घ्यावी.

प्रत-प्राचार्य,दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, हिंगणा रोड, वानाडोंगरी, नागपूर ४४१११०

Scanned by CamScanner